भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

# परकीय चलनाचे वित्तप्रेषण व परकीय चलन रोख्यातील गुंतवणूक (उन्मुक्ती व सूट) अधिनियम, १९९१

(१९९१ चा अधिनियम क्रमांक ४१)

[१५ जून, १९९६ रोजी यथाविद्यमान]

# THE REMITTANCES OF FOREIGN EXCHANGE AND INVESTMENT IN FOREIGN EXCHANGE BONDS (IMMUNITIES AND EXEMPTIONS) ACT, 1991

**[ Act No. 41 of 1991 ]**

**[ As in force on the 15th June 1996 ]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
२००४

**[किंमत : रुपये ४.००]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १५ जून १९९६ रोजी यथाविद्यमान असलेला दि रेमिटन्सेस ऑफ फॉरिन एक्सचेंज ॲन्ड इनव्हेस्टमेंट इन फॉरिन एक्सचेंज बॉन्डस् (इम्युनिटिज् ॲन्ड एक्झम्पशन्स्) ॲक्ट, १९९१ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ८, अंक २, दिनांक २२ डिसेंबर, १९९७ यात पृष्ठ १०९ ते ११२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक : २२ डिसेंबर १९९७.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Remittances of Foreign Exchange and Investment in Foreign Exchange Bonds (Immunities and Exemptions) Act, 1991 as on the 15th June 1996 contains the authoritative taxt of that Act in Marathi which was published in *Gazette of India,* Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 8 dated 22nd December 1997 on pages 109 to 112.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (a) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

NEW DELHI,
Dated : 22nd December 1997.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

(शा.म.मु.) एच ४३८५ (१०४०-७--२००४)

# परकीय चलनाचे वित्तप्रेषण व परकीय चलन रोख्यातील गुंतवणूक (उन्मुक्ती व सूट) अधिनियम, १९९१

कलमांचा क्रम


कलमे

प्रकरण एक

प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व विस्तार

प्रकरण दोन

परकीय चलनाची वित्तप्रेषणे

२. व्याख्या.

३. उन्मुक्ती.

४. विवक्षित प्रकरणातील वित्तप्रेषणे विचारात घेतली जाणार नाहीत.

प्रकरण तीन

परकीय चलन बंधपत्रातील गुंतवणूक

५. व्याख्या.

६. उन्मुक्ती.

७. विवक्षित प्रकरणात परकीय चलन रोखे विचारात घेतले जाणार नाहीत.

# परकीय चलनाचे वित्तप्रेषण व परकीय चलन रोख्यातील गुंतवणूक (उन्मुक्ती व सूट) अधिनियम, १९९१

**(१९९१ चा अधिनियम क्रमांक ४१)**

(१५ जून, १९९६ रोजी यथाविद्यमान)

[१८ सप्टेंबर, १९९१]

परकीय चलनात वित्तप्रेषण मिळणाऱ्या व्यक्तींना व परकीय चलन रोखे यांच्या मालकीचे असतील अशा व्यक्तींना विवक्षित उन्मुक्ती देण्यासाठी आणि अशी वित्तप्रेषणे व रोखे यांच्यासंबंधात प्रत्यक्ष करांमधून विवक्षित सूट देण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी उपबंध करण्याकरिता अधिनियम.

**ज्याअर्थी,** अधिदान ताळेबंदासंबंधीची स्थिती गंभीर झाली असून परकीय चलनाचा मोठा अंत:प्रवाह आकर्षित करणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** परकीय चलनाचा असा अंत:प्रवाह आकर्षित करण्याच्यादृष्टीने, अशा व्यक्तींना परकीय चलनातील उक्त वित्तप्रेषणे आणि उक्त रोखे मालकीचे करणे शक्य व्हावे म्हणून विवक्षित उन्मुक्ती व सूट याबाबत उपबंध करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बेचाळीसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो.—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास, "परकीय चलनाचे वित्तप्रेषण व परकीय चलन रोख्यातील गुंतवणूक (उन्मुक्ती व सूट) अधिनियम, १९९१," असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व विस्तार.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

## प्रकरण दोन

### परकीय चलनाची वित्तप्रेषणे

**२.** या प्रकरणात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "ग्रहिता" याचा अर्थ, आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) याच्या कलम २ च्या खंड (३१) मध्ये, व्याख्या केलेली, या प्रकरणाअन्वये कोणतेही वित्तप्रेषण मिळणारी व्यक्ती, असा आहे ;

(ख) "वित्तप्रेषण" याचा अर्थ, भारताबाहेर निवास असलेल्या कोणत्याही व्यक्तीने भारतात निवास असलेल्या एखाद्या व्यक्तीस या अधिनियमाच्या आरंभाच्या दिनांकी किंवा दिनांकानंतर परंतु, विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी* धनाकर्ष, प्रवासी धनादेश, भारताबाहेरील बँकेचा धनादेश, तार हस्तांतरण, टपाल हस्तांतरण, धनप्रेष या स्वरूपात किंवा परकीय चलन विनियमन अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४६) अन्वये केलेल्या नियमांखाली भारतात ठेवलेला अनिवासी (विदेशी) लेखा, परकीय चलन अनिवासी लेखा किंवा परकीय चलन अनिवासी विशेष ठेव लेखा यांमधून हस्तांतरणाद्वारे परकीय चलनात केलेले वित्तप्रेषण, असा आहे ;

**स्पष्टीकरण.—** या खंडाच्या प्रयोजनार्थ, "विनिर्दिष्ट दिनांक" याचा अर्थ, १ डिसेंबर १९९१ किंवा केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील असा नंतरचा इतर कोणताही दिनांक, असा आहे.

---

*अनुकूलन आदेश क्र. ८००(ई) दिनांक २७-११-१९९१ भाग दोन, कलम ३ (दोन) द्वारे निर्देशिलेला दिनांक १-२-१९९२.

(ग्) या प्रकरणात वापरलेले, परंतु व्याख्या न केलेले आणि परकीय चलन विनियमन अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४६) यामध्ये व्याख्या केलेले इतर सर्व शब्द व वाक्प्रयोग यांना त्या अधिनियमात अनुक्रमे नेमून दिलेले अर्थ असतील.

उन्मुक्ती.

३. (१) त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क्) या प्रकरणान्वये वित्तप्रेषणे मिळण्याच्या प्रयोजनार्थ, भारतीय रिझर्व बँक, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील, अशा योजनेनुसार या प्रकरणान्वये जो उन्मुक्तीची हक्कमागणी करतो त्या ग्रहित्याला कोणत्याही प्रयोजनार्थ, त्याला मिळालेल्या वित्तप्रेषणाचे स्वरूप व साधन उघड करण्याची आवश्यकता नसेल ;

(ख्) ग्रहित्याला असे वित्तप्रेषण मिळाले आहे या कारणावरून त्या ग्रहित्याच्या बाबतीत कोणत्याही कायद्यान्वये चौकशीस किंवा अन्वेषणास प्रारंभ करण्यात येणार नाही ;

(ग्) ग्रहित्यास वित्तप्रेषण मिळाले आहे ही वस्तुस्थिती विचारात घेतली जाणार नाही आणि अशा कोणत्याही कायद्याखालील कोणताही अपराध किंवा कोणतीही शास्ती लादणे याच्याशी संबंधित अशा कोणत्याही कार्यवाहीत ती पुरावा म्हणून अस्वीकार्य असेल.

(२) पोट-कलम (१) मधील कोणतीही गोष्ट,—

(क्) जे कोणतेही परकीय चलन—

ज्या कालावधीत ते भारतात आणावयाचे आहे असा कालावधी जर संपलेला नसेल, किंवा असा कालावधी केंद्र शासनाने किंवा रिझर्व्ह बँकेने किंवा कोणत्याही इतर प्राधिकरणाने कोणत्याही रीतीने वाढवला असेल त्याबाबतीत, असा वाढीव कालावधी या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास संपलेला नसेल तर,

(एक) परकीय चलन विनियमन अधिनियम, १९७३ ; किंवा

(दोन) परकीय चलन विनियमन अधिनियम, १९७३ यांसह आयकर अधिनियम, १९६१ याच्या उपबंधांन्वये भारतात आणणे आवश्यक असेल अशा कोणत्याही परकीय चलनास—

(ख्) भारतीय दंड संहितेचे (१९६० चा ४५) प्रकरण नऊ किंवा प्रकरण सतरा, अंमली औषधिद्रव्ये व मन:प्रेरक पदार्थ अधिनियम, १९८५ (१९८५ चा ६१), दहशतवादी व विघटनकारी कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम, १९८७ (१९८७ चा २८), भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ (१९८८ चा ४९) याखालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधांच्या खटल्याच्या संबंधात किंवा कोणतेही नागरी दायित्व लादण्याच्या प्रयोजनासाठी,—

लागू होणार नाही.

(३) केंद्र शासन, खंड (क्) पोट-कलम (१) अन्वये अधिसूचित केलेली योजना ती अधिसूचित केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

विवक्षित प्रकरणातील वित्तप्रेषणे विचारात घेतली जाणार नाहीत.

४. कलम ३ च्या उपबंधांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता,—

(क्) या प्रकरणान्वये मिळालेले कोणतेही वित्तप्रेषण, आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) खालील कोणत्याही कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ विचारात घेतले जाणार नाही, आणि विशेषत: ग्रहिता त्या अधिनियमाखालील कोणतीही आकारणी, पुनर्आकारणी, अपील, निर्देश किंवा इतर कार्यवाही यामध्ये कोणतीही वजावट किंवा सहाय्य यांची हक्क-मागणी करण्यास किंवा त्याला असे वित्तप्रेषण मिळाले आहे या आधारे त्या अधिनियमान्वये केलेली कोणतीही आकारणी किंवा पुनर्आकारणी पुन्हा सुरू करण्यास हक्कदार असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—शंका निरसनार्थ, याद्वारे असे घोषित केले आहे की, ग्रहित्यास वित्तप्रेषणाच्या रकमेमधून जे उपार्जित किंवा प्राप्त झाले असेल किंवा उपार्जित किंवा प्राप्त झाले असल्याचे मानण्यात आले असेल, अशा कोणत्याही उत्पन्नास आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) याचे उपबंध लागू होतील.

(ख्) या प्रकरणान्वये मिळालेले कोणतेही वितप्रेषण हे, १ एप्रिल, १९९२ पूर्वी प्रारंभ होणाऱ्या कोणत्याही (कर) आकारणी वर्षाच्या संबंधात. धनकर अधिनियम, १९५७ (१९५७ चा २७) अन्वये करपात्र व्यक्तीच्या निव्वळ धनाचे संगणन करण्याच्या प्रयोजनार्थ, त्या व्यक्तीच्या मत्तेचा भाग बनणार नाही.

## प्रकरण तीन

## परकीय चलन बंधपत्रातील गुंतवणूक

**५.** (१) या प्रकरणात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क्) " परकीय चलन रोखे " याचा अर्थ, ज्यामध्ये या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्या दिनांकानंतर, परंतु, विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी,* गुंतवणूक करावयाची आहे असे, भारताची रिझर्व्ह बँक याबाबतीत **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा योजनेस अनुसरून, भारताची स्टेट बँक अधिनियम, १९५५ यान्वये घटित करण्यात आलेल्या स्टेट बँकेने काढलेले रोखे, असा आहे.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ, " विनिर्दिष्ट दिनांक " याचा अर्थ, १ डिसेंबर, १९९१ किंवा केंद्र शासन या संबंधात **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील असा नंतरचा दिनांक, असा आहे.

(ख्) " अनिवासी भारतीय " याचा अर्थ, अशी व्यक्ती, जी भारतीय नागरिक किंवा मूळची भारतीय असून तिचा निवास भारताबाहेर आहे, असा आहे.

**स्पष्टीकरण १.**—एखादी व्यक्ती पुढील बाबतीत मूळची भारतीय आहे असे समजण्यात येईल,—

(एक) ती किंवा तिच्या आई-वडिलांपैकी कोणीही किंवा तिच्या आजा-आजीपैकी कोणीही संविधान किंवा नागरिकत्व अधिनियम, १९५५ याच्या आधारे भारताचे नागरिक होते, असे असेल तर ; किंवा

(दोन) तिने कोणत्याही वेळी भारतीय पासपोर्ट धारण केलेला होता असे असेल तर, परंतु पाकिस्तान किंवा बांगलादेशाच्या नागरिकांना मूळचे भारतीय म्हणून मान्यण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण २.**—एखाद्या मूळच्या भारतीय व्यक्तीचा (पाकिस्तान किंवा बांगलादेशाचा नागरिक नसलेला/नसलेली) पती किंवा पत्नी ही मूळची भारतीय म्हणून मानण्यात येईल ;

(ग्) " विदेशी निगम निकाय " याचा अर्थ, जिच्यामध्ये कोणत्याही अनिवासी भारतीयाचा कोणताही हितसंबंध आहे अशी, भारताबाहेरील एखाद्या देशाच्या कायद्याद्वारे प्रस्थापित करण्यात आलेली कोणतीही संस्था, अधिसंघ किंवा निकाय---मग तो विधिसंस्थापित असो वा नसो, असा आहे ;

(घ्) या प्रकरणात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले आणि परकीय विनियमन अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४३) यामध्ये व्याख्या केलेले सर्व इतर शब्द व शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमात यथाक्रम ठरवून दिलेले अर्थ असतील.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (क्) अन्वये अधिसूचित केलेली ही योजना केंद्र शासन, ती अधिसूचित केल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

**६.** (१) धनकर अधिनियम, १९५७ (१९५७ चा २७), दानकर अधिनियम, १९५८ (१९५८चा १८), उन्मुक्ती. आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३), परकीय चलन विनियमन अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४६) आणि विदेशी अंशदान (विनियमन) अधिनियम, १९७६ (१९७६ चा ४९) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क्) ज्याच्याकडे परकीय चलन रोखे आहेत अशा कोणाही अनिवासी भारतीयाने किंवा विदेशी निगम निकायाने, किंवा अशा अनिवासी भारतीयाकडून किंवा विदेशी निगम निकायाकडून असे रोखे दान म्हणून ज्या व्यक्तीला दिले गेले असतील, अशा भारतात निवास असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही प्रयोजनासाठी, अशा रोख्यातील गुंतवणुकीचे स्वरूप व मार्ग उघड करणे आवश्यक असणार नाही ;

(ख्) खंड (क्) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींपैकी कोणत्याही व्यक्तीविरुद्ध, असे रोखे अशा व्यक्तींच्या मालकीचे आहेत या कारणावरून उक्त अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये चौकशीस किंवा अन्वेषणास प्रारंभ करण्यात येणार नाही.

(ग्) असे रोखे, खंड (क्) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीपैकी कोणत्याही व्यक्तींच्या मालकीचे आहेत, ही वस्तुस्थिती विचारात घेतली जाणार नाही आणि उपरोक्त कोणत्याही अधिनियमाखालील कोणत्याही अपराधासंबंधीच्या किंवा कोणत्याही शास्ती लादण्यासंबंधीच्या कोणत्याही कार्यवाहीत ती पुरावा म्हणून अग्राह्य असेल.

*अनुकूलन आदेश क्र. ८००(ई) दिनांक २७-११-१९९१ भाग दोन, कलम ३ (दोन) द्वारे निर्देशिलेला दिनांक १-२-१९९२.

(२) पोट-कलम (१) मधील कोणतीही गोष्ट—

जे कोणतेही परकीय चलन, ज्या कालावधीत ते भारतात आणावयाचे आहे असा कालावधी जर संपलेला नसेल, किंवा असा कालावधी केंद्र शासनाने किंवा रिझर्व्ह बँकेने किंवा कोणत्याही इतर प्राधिकरणाने कोणत्याही रीतीने वाढवला असेल त्याबाबतीत असा वाढीव कालावधी या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास संपलेला नसेल तर,—

(एक) परकीय चलन विनियमन अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४६) ; किंवा

(दोन) परकीय चलन बिनियमन अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४६) यासह आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४८),

याच्या उपबंधांन्वये भारतात आणणे आवश्यक असेल अशा परकीय चलनास लागू होणार नाही.

विवक्षित प्रकरणात परकीय चलन रोखे विचारात घेतले जाणार नाहीत.

**७.** कलम ६ च्या उपबंधांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता,—

(क) आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) याचे उपबंध, परकीय चलन रोख्यांच्या संबंधात उपार्जित होणाऱ्या कोणत्याही व्याजास लागू होणार नाहीत ;

(ख) धनकर अधिनियम, १९५७ (१९५७ चा २७) याचे उपबंध, परकीय चलन रोख्यांच्या संबंधात लागू होणार नाहीत ;

(ग) दानकर अधिनियम, १९५८ (१९५८ चा १८) याचे उपबंध कोणताही अनिवासी भारतीय भारताचा निवासी होतो आणि परकीय चलन रोख्यांचे बक्षीसपत्र करतो त्याबाबतीत लागू होणार नाहीत.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई